जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४२ दिनांक - २५/१२/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-२ गुन्हे शाखा पुणे शहर

## वाहन चोरी करणा-या सराईतास केले जेरबंद

दि.२३/१२/२०२४ रोजी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-२ मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हडपसर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात गस्त करीत असताना,पोलीस अंमलदार विक्रांत सासवडकर यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे त्यांनी इसम नामे **अर्जुन हिराजी भोसले वय २१ वर्षे रा.दत्त मंदिराचे जवळ अप्पर इंदिरानगर पुणे** याचे कब्जात मिळुन आलेली दुचाकी ही चोरीची असल्याचा संशय आल्याने त्यास ताब्यात घेवुन ,त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने पुणे शहर कार्यक्षेत्रातुन दुचाकी वाहने विक्री करण्याचे उद्देशाने चोरी केली होती, नमुद आरोपी अर्जुन हिराजी भोसले याचेकडुन १,६५,०००/- रु.च्या एकुण ०६ दुचाकी वाहने जप्त करण्यात आलेली आहे.त्याचेकडुन हडपसर,विश्रामबाग,भारती विद्यापीठ ,चतुश्रृंगी व डेक्कन पोलीस स्टेशन कडील एकुण ६ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),पुणे शहर श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वाहिद पठाण (अतिरीक्त कार्यभार) दरोडा वाहन चोरी पथक २, सहा.पो. निरी. सी.बी.बेरड, पोलीस अंमलदार राजेश अभंगे ,दिनकर लोखंडे, अशोक आटोळे,राजेश लोखंडे,विनायक रामाणे,दत्तात्रय खरपुडे, सुनिल महाडीक,गणेश लोखंडे, राहुल इंगळे,विक्रांत सासवडकर,विनायक येवले व अमोल सरतापे यांनी केली आहे.


पोलीस आयुक्तालय
रोडा व वाहनचोरी विरोधी पथक २
गुन्हे शाखा, पुणे शहर